# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सायंकाळ)

जा.क्र. ३३८/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक:—१९/०६/२०१६.

**१) ऑटोची स्कुटी गाडीला धडक, तीन जखमी. :—**

दिनांक ११/०६/२०१६ रोजी ०८.३० वा. दरम्यान फिर्यादी भगवान गोपीनाथ शेंडे, वय ४० वर्ष रा. तिरखुरी यांची मुलगी मयुरी ही तिची चुलत बहीन विद्या शेंडे आणि गावची मुलगी आचल चौधरी यांच्या सोबत मिळुन स्कुटी क्र. एमएच ३६ यु ५५५८ ने तिब्बल सिट बसुन तिरखुरी वरून अडयाळ येथे डांबरी रोडने आपल्या साईडने येत असतांनी अडयाळ शिवारात अडयाळ वरून पालांदुरकडे डांबरी रोडने जाणा—या **यातील आरोपी ऑटो चालकाने आपल्या ताब्यातील वाहन भरधाव वेगाने व निष्काळजीपने चालवुन फिर्यादीच्या मुलीच्या स्कुटीला अडयाळ शिवार येथे धडक मारून स्कुटीवर बसलेल्या तिन्ही मुलीस जखमी करण्यास** कारनीभुत झाला. असे फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम २७९,३३७ भादंवि सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**२) विषारी औषध खांल्ल्याने सहा गार्यीचा मृत्यु. :—**

दिनांक १७+१८/०६/०१६ रोजी १९.०० वा. दरम्यान फिर्यादी ईश्वर महादेव टाले, वय ३४ वर्ष रा. उसरीपार याचे सोबतच्या इसमाने एकुण ६ गायी चारण्याकरीता गावाच्या बाहेर शेतामध्ये नेले होते. तेव्हा गार्यीनी कोणतेतरी विषारी औषध खाल्ले आहे असे पशुवैद्यकीय अधिका—याने कळविले. तसेच संशयीत आरोपीचे वाळीमध्ये गायी चरण्याकरीता गेल्याने काहीतरी **विषारी औषध टाकुण ती औषधी गार्यीनी खावुन ६ गायी मरण पावल्याने फिर्यादीच्या सोबतच्या इसमाचे १,४०,०००/—रु. चे नुकसान** केले. असे फिर्यादीचे तोंडी रिपोर्टवरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ४२९ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास पोहवा. सतदेवे पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) महीलेस मारहाण करून जाती वाचक शिविगाळ करून जिवंत जाळण्याची धमकी दिली.:—**

दिनांक १८/०६/०१६ रोजी ११.०० वा. दरम्यान ग्रा.पं. सदस्य फिर्यादी महीला ही ग्रा.पं. सभेला हजर असतांना आशा स्वयंसेविका पद कार्यमुक्त प्रक्रीया थांबविण्याबाबत लेखी पत्र दिले होते. या विषयी ग्रा.पं. सरपंच सोबत चर्चा करीत असतांना व पद सोडण्याकरीता २ दिवस मुदत दया असे म्हणाली तेव्हा **यातील आरोपीतांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन फिर्यादी महीलेस सभेमध्ये मारहान करून जाती वाचक शिविगाळ करून जिवंत जाळण्याची धमकी दिली. असे** फिर्यादीचे लेखी व डॉ. रिपोर्टवरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १४३,३२३,५०४,५०६ भादंवि सहकलम ४(१)(आर) अनुसुचीत जाती जमाती प्रती. सुधारणा कायदा २०१६ अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड सा. हे करीत आहेत.

**४) महीलेस अश्लिल शब्दात शिविगाळ करून टेबल खुर्च्या फेकुन मारू अशी धमकी दिली. :–**

दिनांक १८/०६/०१६ रोजी १२.३० वा. दरम्यान फिर्यादी महीला (ग्रा.पं. सरपंच) यांच्या अध्यक्षतेखाली तालुका अधिकारी भंडारा आशा सेविका पद कार्यमुक्त करण्याबाबत विशेष ग्रामसभा आयोजीत करून आशा सेविका पदमुक्त करण्याबाबत चर्चा करीत असतांना सभेत हजर **यातील आरोपी यांनी गैर कायदयाची मंडळी जमवुन " तु केव्हांची सरपंच झाली तुला वेळ देता येत नाही का " असे शब्दप्रयोग करून अश्लिल शब्दात शिविगाळ केली व टेबल खुर्च्या फेकुन मारूण अशी धमकी दिली. असे** फिर्यादीचे लेखी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १४३,२९४,५०४,५०६ भादंवि अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. तपास उपविभागीय पोलीस अधिकारी भंडारा श्री. जोगदंड सा. हे करीत आहेत.

**पोलीस उपअधिक्षक(गृह)**
**भंडारा करीता**

**प्रति,**

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.